# अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी आणि
# गोगटे - जोगळेकर वरिष्ठ पदवी व पदव्युत्तर महाविद्यालय, रत्नागिरी.

## महत्वाची सूचना

दिनांक ३१/०८/२०१९

**कनिष्ठ, वरिष्ठ पदवी व पदव्युत्तर विभागातील शैक्षणिक वर्ष ( २०१९ - २०२० )** मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात इ.११ वी कला, विज्ञान, वाणिज्य, एम.सी.व्ही.सी. व प्रथम वर्ष कला, विज्ञान,वाणिज्य तसेच पदव्युत्तर विभागातील एम.ए., एम.एस्सी, एम.कॉम. भाग -१ मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय शिष्यवृत्तीखाली सवलत घेऊन प्रवेश घेतला आहे अशा सर्व विद्यार्थी - विद्यार्थिनींनी मा.समाजकल्याण अधिकारी, रत्नागिरी यांच्या सूचनेनुसार आपला सवलतीचा अर्ज https://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर नव्याने ( **Fresh** ) बिनचूक भरावयाचा आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी ( शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ) मध्ये सवलत घेऊन पुढील वर्गांमध्ये प्रवेश घेतला आहे. उदा. इ.१२ वी कला, विज्ञान, वाणिज्य एम.सी.व्ही.सी. तसेच द्वितिय व तृतिय वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य तसेच पदव्युत्तर विभागातील एम.ए., एम.एस्सी, एम.कॉम. भाग -२ मधील विद्यार्थ्यांनी आपले अर्ज नुतनीकरण ( **Renewal** ) वरील वेबसाईटवर पूर्ण भरावे. **तसेच मागील वर्षी ज्या विद्यार्थ्यांनी सवलतीचा अर्ज भरला नसेल अशा विद्यार्थ्यांनी वरील वेबसाईटवर नव्याने ( Fresh ) अर्ज बिनचूक भरावयाचा आहे.** फॉर्म भरुन झाल्यावर त्याची छापील एक प्रत संबंधित काम पहाणा-या कर्मचा-यांकडे दिनांक २५/०९/२०१९ पर्यंत सकाळी १०.३० ते दुपारी २.०० या वेळेत द्यावयाचे आहेत. या तारखेपर्यंत छापील अर्जाची प्रत संबंधित कर्मचा-यांकडे जमा न केल्यास त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांवर राहील व शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची पूर्ण फी भरावी लागेल याची नोंद घ्यावी. शिष्यवृत्तीसाठी लागणारी कागदपत्रे खालीलप्रमाणे आहेत छापील अर्जासोबत खालील झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.

०१. एस.एस.सी. / एच.एस.सी.गुणपत्रकाची झेरॉक्स सत्यप्रत - १
०२. शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्स सत्यप्रत - १
०३. मागील वर्षीच्या गुणपत्रकाची झेरॉक्स सत्यप्रत - १
०४. जातीच्या दाखल्याची ( तहसिलदार कार्यालयातील ) झेरॉक्स सत्यप्रत - १
०५. नॉन क्रिमिलिअर ( दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत वैध असलेले ) प्रमाणपत्राची झेरॉक्स सत्यप्रत - १
०६. स्वतःच्या आधारकार्डाची झेरॉक्स सत्यप्रत - १
०७ रेशनकार्डची झेरॉक्स सत्यप्रत - १
०८. डोमीसाईल दाखला (वास्तव्याचा दाखला ) झेरॉक्स सत्यप्रत - १

०९. सद्यस्थितीत चालू असलेला मोबाईल नंबर आधार कार्डाशी संलग्न करणे आवश्यक आहे कारण त्या नंबरवर आपल्या सवलतीच्या अर्जाचा OTP नंबर येणार आहे व नंतरच आपला अर्ज भरला जाणार आहे. विद्यार्थ्याचा स्वतःचा इमेल आयडी असणे आवश्यक आहे मोबाईल प्रमाणेच इमेल आयडी वर सुध्दा OTP पाठविला जातो. आधार कार्डाशी संलग्न झालेला सदर मोबाईल नंबर व ईमेल आय डी बदलू नये.

१०. वडील हयात असल्यास वडीलांच्या वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.वडील हयात नसल्यास आईच्या वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे आई व वडील दोन्ही हयात नसतील त्यांनी संगोपन करणा-या पालकाच्या वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत -१

( उत्पन्नाचे सदर दाखले शासनाच्या सेतू कार्यालयामार्फत दिलेले असणे आवश्यक आहे. )

अ) **इयत्ता १२ वी कला / विज्ञान / वाणिज्य / एम.सी.व्ही.सी. तसेच द्वितिय वर्ष / तृतिय वर्ष कला / विज्ञान / वाणिज्य / एम.ए./ एम.कॉम./ एम.एस्सी भाग -२ वर्षामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रथमवर्षामध्ये सवलत घेतलेला उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. झेरॉक्स सत्यप्रत - १**

ब) **इयत्ता ११ वी कला / विज्ञान / वाणिज्य / एम.सी.व्ही.सी. तसेच प्रथम वर्ष कला / विज्ञान / वाणिज्य तसेच एम.ए./ एम.कॉम./ एम.एस्सी भाग -१ या विद्यार्थ्यांनी ( दिनांक ०१/०४/२०१८ ते दिनांक ३१/०३/२०१९ या वर्षाचा तहसिलदार कार्यालयातील उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत - १**

OBC / VJNT / SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप साठी उत्पन्न मर्यादा **रु. १,००,०००/-** व फ्रीशिपसाठी उत्पन्न मर्यादा **रु. ८,००,०००/**

SC / ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप साठी उत्पन्न मर्यादा **रु.२,५०,०००/-** व फ्री शिपसाठी उत्पन्न मर्यादा नाही.

वर नमुद सुचनेप्रमाणे आपल्या उत्पन्न गटाप्रमाणे स्कॉलरशिप / फ्रीशिपचा योग्य पर्याय विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना बिनचुक निवडणे आवश्यक आहे व सदर जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे.

११. वडील हयात नसल्यास त्यांच्या मृत्युचा दाखला किंवा आई घटस्फोटीत असल्यास त्याबद्दलचे रु.१००/- च्या स्टॅंप पेपर वर प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे त्याची झेरॉक्स सत्यप्रत - १

१२. शिक्षण घेत असताना खंड ( गॅप ) पडला असल्यास रु.१००/- च्या स्टॅंपपेपर वर प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे त्याची झेरॉक्स सत्यप्रत - १ ( तहसिलदार कार्यालयातील )

१३. स्वतःचे बचत खाते ( Bank A/c ) कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेतून काढून आपले आधार कार्ड बॅंक खात्याशी संलग्न करणे आवश्यक आहे त्याची झेरॉक्स सत्यप्रत - १ जोडणे आवश्यक आहे. बॅंकेतील खाते NPCI - Mapping याच्याशी सुध्दा संलग्न करणे आवश्यक आहे. यासाठीचा छापील अर्ज नोटीस बोर्डावर लावला आहे. तसेच महाविद्यालयाची वेबसाईट resgjcrtn.com वर उपलब्ध आहे. सदर अर्ज भरुन बॅंकेमध्ये दाखल करावा.

१४. महाविद्यालयात प्रवेश घेताना भरलेल्या रक्कमेच्या चलनाची मूळ पावतीची - १ झेरॉक्स प्रत जोडावी.

**ऑनलाईन शिष्यवृत्तीचा अर्ज भरताना खालील प्रमाणे सूचनांचे पालन करुन अर्ज भरावा.**

०१. शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी फक्त मुळ ( Original ) कागदपत्रेच स्कॅन करुन ती वेबसाईटवर अपलोड करावयाची आहेत. कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपलोड करु नयेत.

०२. **SC/ ST/ VJNT/ SBC** या प्रवर्गाचे जे विद्यार्थी शासकीय मागासवर्गीय वसतिगृहात रहात असतील त्यांनीच फक्त **HOSTELLER** हा ऑप्शन निवडावयाचा आहे.

०३. **VJNT / SBC / OBC** या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबातील फक्त २ मुलगे शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यास पात्र आहेत. ३ रा मुलगा शिष्यवृत्तीचा लाभ घेवू शकत नाही. मुलींसाठी तसेच **SC / ST** प्रवर्गासाठी अपत्य मर्यादा नाही.

०४. कुटुंबातील पुरुष अपत्यांची संख्या दर्शविणारे प्रतिज्ञापत्र पालकांची तसेच विद्यार्थ्यांची सही करुन त्याची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावयाची आहे. सदर प्रतिज्ञापत्राचा नमूना महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला आह, तसेच महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्यात आला आहे.

**शिष्यवृत्तीचे अर्ज पूर्णभरुन कार्यालयातील खालील कर्मचा-यांकडे द्यावेत -**

तसेच या बाबत कोणतीही अडचण असल्यास याच कर्मचा-यांकडे त्वरित संपर्क साधवा.

०१. वरिष्ठ महाविद्यालय इतर मागासवर्गीय शिष्यवृत्ती / फ्री शिप शिष्यवृत्ती - **श्री.गोळपकर एन.एस.**

०२. कनिष्ठ महाविद्यालय इतर मागासवर्गीय शिष्यवृत्ती / फ्री शिप शिष्यवृत्ती - **श्री. जोशी डी.टी.**

०३. कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर विभाग मागासवर्गीय शिष्यवृत्ती / फ्री शिप शिष्यवृत्ती व पदव्युत्तर १/२ विभाग इतर मागासवर्गीय शिष्यवृत्ती / फ्री शिप शिष्यवृत्ती - **श्री.पेडणेकर एस.व्ही.**

०४. कनिष्ठ महाविद्यालय एम.सी.व्ही.सी. विभाग सर्व शिष्यवृत्ती - **श्री. मुळे आर.आर.**

प्राचार्य.